CNR: MHSI05-000306-2018

**नियमीत दिवाणी मुकदमा नं. ३२/२०१८ मधील निशाण ४९ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाखल करण्यात आलेला असुन सदर अर्जाव्दारे वादीने असे नमुद केले आहे निशाण ५ व निशाण ३८ वरील वादीचा अर्ज न्यायालयाने नामंजुर केलेला असल्याने त्याचे विरुध्द अपिल दाखल करण्यासाठी त्यांना १५ दिवसांचा कालावधी आवश्यक आहे. त्या कालावधीत प्रतिवादींना दावा जमिनीत कोणत्याही प्रकारचे बांधकाम केल्यास अगर शौचालयाची टाकी शौचालयास जोडल्यास वादीचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब पुढील १५ दिवसांसाठी 'जैसे थे' आदेश परिस्थिती ठेवावी असा आदेश प्रतिवादींविरुध्द करावा अशी विनंती वादीने केलेली आहे.

२. या अर्जास प्रतिवादी तर्फे हरकत घेण्यात आलेली असुन त्यांनी असे नमुद केलेले आहे की न्यायालयाने सर्व परिस्थितीचा आणि कागदपत्रांचा योग्यतो विचार करुन निर्णय दिलेला आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करावा.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. ही गोष्ट स्पष्ट आहे की न्यायालयाने उभय पक्षकारांची बाजु ऐकून निशाण ५ व ३८ वरील अर्ज नामंजूर केलेला आहे. महत्वाचे म्हणजे वादीने स्वच्छ हेतुने न्यायालयासमोर प्रथमदर्शी त्याची बाजु न मांडल्यामुळे त्यांचा अर्ज नामंजुर केलेला आहे. सबब वादी मागणी करतो त्याप्रमाणे पुन्हा 'जैसे थे' आदेश करणे हे या न्यायालयाच्या आदेशाला बगल देण्यासारखे होणार असुन त्यातून प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे उपरोक्त परिस्थितीमध्ये मी खालील आदेश पारित करतो.

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/—

दिनांक— ०५/०९/२०१८

(विनायक द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर.वेंगुर्ला.